# अश्रू.....



दु:खाच्या खाईत लोटलेले अन्
सुखाच्या ठाई उभारलेले हे
झाकता आले तर ठीक,
नाहीतर.....
भावनांच्या कल्लोळात
मनमुराद वाहतात......

शिणलेल्या मनाला हलकं करतात,
तर डोळ्यातून शब्दच फेकून जातात.
ओठांचीही मुभा न बाळगणारे हे
चांगल्या सुरात गातात.
लालबुंद निखाऱ्यातून ठिपकताना
एकांत शोधतात.....

कित्येक अपेक्षाभंगाच्या गर्दितून
निसटून........तरळून जातात.
सोबत वाहत दु:खाची दरड
करत भावनांची पडझड
मनी देत कोणाला साद
बिंबवत मनावर अघोरी पडसाद......

कु.भक्ती चंद्रकांत पानसरे
व्दितीय वर्ष – विज्ञान